आयडीएफसी फर्स्ट बँक फॉरेक्स कार्ड वापरण्याआधी कृपया खाली दिलेल्या अटी आणि नियम काळजीपूर्वकपणे वाचा. सदर कार्ड वापरून, तुम्ही या अटी आणि नियमांशी सहमत आहात आणि संबंधित भारतीय रिझर्व्ह बँकेचे विनियम, भारतीय रिझर्व्ह बँकेचे चलन नियंत्रण विनियम, परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 ('कायदा'), वेळोवेळी सुधारित/ फेरबदल केलेल्या/ लागू कायद्याच्या आणि वेळोवेळी इतर कोणत्याही संबंधित अधिनियमाच्या अंतर्गत तयार केलेल्या सर्व लागू नियम आणि विनियमांचे पालन करण्याचे वचन देतात.

व्याख्या :

1. **एटीएम** : जगभरात विसा लोगो दर्शवणाऱ्या इतर बँकांच्या शेयर्ड नेटवर्क द्वारे व्यवस्थापित ऑटोमेटेड टेलर मशिन्स.
2. **कार्ड** : आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड द्वारे जारी केलेले आयडीएफसी फर्स्ट बँक फॉरेक्स कार्ड.
3. **कार्डधारक** : बँकेचे ग्राहक ज्यांना कार्ड जारी करण्यात आले आहे. पुरुषी लिंगातील सर्व संदर्भांमध्ये स्त्री लिंगाचा समावेश होतो.
4. **आयडीएफसी फर्स्ट बँक** : म्हणजेच आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड, कंपनी कायदा 2013 अंतर्गत नोंदणी केलेली कंपनी आणि बँकिंग विनियम कायदा, 1949 अंतर्गत बँकिंग कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय केआरएम टॉवर, 79, पहिला मजला, हॅरिंगटन रोड, चेन्नई, भारत येथे आहे. ("आयडीएफसी बँक" किंवा "बँक")
5. **"व्यापारी' किंवा "व्यापारी आस्थापना" :** म्हणजेच आस्थापना ज्या कुठेही स्थित आहेत ज्या कार्ड स्वीकारतात/ आदर करतात आणि यामध्ये कार्डचा आदर करणाऱ्या इतर स्टोर्स, दुकाने, रेस्टोरंट्स, हवाई सेवा, संस्था इत्यादींचा समावेश असेल.
6. **पिन :** वैयक्तिक ओळख क्रमांक (पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर) जो ग्राहकाला कार्ड व्यवस्थापनेसाठी पुरवण्यात आलेल्या सेल्फ-केयर वेब पोर्टल लिंक वरून कार्डधारकाद्वारे तयार करण्यात आला आहे.
7. **पीओएस टर्मिनल :** परदेशातील व्यापारी आस्थापनेतील पॉइंट ऑफ सेल इलेक्ट्रॉनिक टर्मिनल्स (भारत, नेपाळ आणि भूतान वगळून), जे व्यवहार प्रक्रिया करण्यासाठी सक्षम आहेत आणि जेथे इतर गोष्टींसोबतच, कार्डधारक खरेदी करण्यासाठी त्याचा प्रवास निधी वापरू शकतो.
8. **शेयर्ड नेटवर्क** : एटीएम जे आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या मालकीचे नाहीत, परंतु आयडीएफसी फर्स्ट बँकेद्वारे जारी केलेले कार्ड स्वीकारतात.
9. **व्यवहार** : एटीएम मधून रोख रक्कम काढणे आणि/किंवा व्यापारी आस्थापनेत आणि/किंवा ई-कॉमर्स साइट वर कार्ड वापरून केलेली खरेदी.

कार्डसाठी पात्रता

1. कुणीही भारतीय नागरिक ज्यांच्याकडे आयडीएफसी फर्स्ट बँकेचे बचत खाते आहे भारतातील कोणत्याही आयडीएफसी फर्स्ट बँक शाखेतून कार्ड जारी करण्यासाठी अर्ज करू शकतो.

2. कार्ड जारी करणे हे कार्ड अर्जदाराने लागू कायदे (परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 सह), नियम, विनियम आणि भारतीय रिझर्व बँक द्वारे किंवा वेळोवेळी अंमलात असलेल्या लागू कोणत्याही कायद्यांतर्गत इतर योग्य प्राधिकरणाद्वारे जारी केलेल्या निर्देशांचे पालन करण्याच्या अधीन आहे.
3. कार्डसाठी अर्जदाराने आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या आवश्यकतेनुसार पूर्ण आणि रीतसर सही केलेला अर्ज जमा करणे आवश्यक आहे आणि पुढे आयडीएफसी फर्स्ट बँकेद्वारे आवश्यक असलेली अशी सर्व कागदपत्रे सुद्धा जमा करावी लागतील.

वैधता

कार्ड हे छपाईच्या तारखेपासून (MM/YY) 5 वर्षांच्या कालावधीसाठी वैध आहे आणि अहस्तांतरणीय आहे.

कार्ड सक्रिय करणे

1. सर्व अटींची पूर्तता झाल्यावर कार्ड सक्रिय केले जाईल, ज्यामध्ये एलआरएस (लिबरलाइज्ड रेमिटन्सेस स्किम) लिमिट अंतर्गत येणारे व्यवहार, बँकेच्या केंद्रीय संचालन टीम द्वारे मंजूरी, ग्राहकाच्या खात्यातून रक्कम यशस्वीरित्या कापणे आणि कार्डामध्ये मुद्रा लोड करण्याचा समावेश आहे. ग्राहकाने सेल्फ-केयर वेब पोर्टल द्वारे कार्ड सक्रिय करणे अनिवार्य आहे. कार्ड जारी केल्यावर, बँक कार्डात लोड केलेल्या फॉरेक्स फंड्सच्या रकमेची पुष्टी करण्यासाठी कार्डधारकाला एक एसएमएस (या कलमाच्या हेतूसाठी "एसएमएस" चा अर्थ असेल शॉर्ट मेसेजिंग सर्विस आणि यामध्ये कार्डधारकाला त्याच्या नोंदणीकृत भारतीय मोबाइल क्रमांकावर कस्टमाइज्ड मेसेजेस पाठवण्याचा समावेश आहे) पाठवण्याचा प्रयत्न करेल. बँक कोणत्याही क्षणी तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे ही सुविधा कधीही काढून घेऊ शकते.

कार्डाचा वापर

1. या कार्डाचा उपयोग भारत, नेपाळ आणि भूतान वगळून जगभरातील कोणत्याही एटीएम मधून फॉरेक्स फंड्स मिळवण्यासाठी केला जाऊ शकतो, जे असे कार्ड स्वीकार करतात. फॉरेक्स फंड्स काढण्यासाठी, कार्डधारकाला कार्ड एटीएम मध्ये टाकावे लागेल, पिन आणि इच्छित फॉरेक्स फंड्सची रक्कम प्रविष्ट करावी लागेल. असा उपयोग केल्यावर कार्ड परत घेतले पाहिजे.
2. कार्डधारक भारत, नेपाळ आणि भूतान वगळून इतर ठिकाणच्या व्यापारीत आस्थापनेमध्ये लागलेले शुल्क देण्यासाठी कार्डाचा वापर करु शकतात, मात्र हे या अटीच्या अधीन आहे कि आयडीएफसी फर्स्ट बँक आणि व्यापारी आस्थापना कोणत्याही कारणाने कार्डचा वापर अस्वीकार करू शकतात. कार्डद्वारे केलेल्या प्रत्येक खरेदीची रक्कम किंवा काढलेली फॉरेक्स फंड्सची रक्कम ताबडतोब कार्डधारकाच्या फॉरेक्स फंड्समधून कापली जाईल. जर विनंती केलेला व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्यात पुरेसा फॉरेक्स फंड नसेल, तर व्यवहार पूरण केला जाणार नाही.
3. कार्डधारक (भारत, नेपाळ आणि भूतान वगळून) परदेशी चलनामध्ये केलेल्या ऑनलाइन खरेदीकरीता ई-कॉमर्स संकेतस्थळांवर खरेदी करण्यासाठी कार्डाचा वापर करु शकतात, मात्र हे या अटीच्या अधीन आहे कि आयडीएफसी फर्स्ट बँक आणि व्यापारी आस्थापना कोणत्याही कारणाने कार्डचा वापर अस्वीकार करू शकतात. कार्डद्वारे केलेल्या प्रत्येक खरेदीची रक्कम किंवा काढलेली फॉरेक्स फंड्सची रक्कम ताबडतोब कार्डधारकाच्या फॉरेक्स फंड्समधून कापली जाईल. जर विनंती केलेला व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्यात पुरेसा फॉरेक्स फंड नसेल, तर व्यवहार पूर्ण केला जाणार नाही.

4. कार्डसाठी अर्जदाराने आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या आवश्यकतेनुसार पूर्ण आणि रीतसर सही केलेला अर्ज जमा करणे आवश्यक आहे आणि पुढे बँकेद्वारे आवश्यक असलेली अशी सर्व कागदपत्रे सुद्धा जमा करावी लागतील. कार्ड इंटरनेटवरील इलेक्ट्रॉनिक व्यवहारासाठी सुद्धा वापरले जाऊ शकते जेथे व्यवहारासाठी भरणा परकीय चलनात करायचा आहे. कार्डधारक, बँकेद्वारे विहित केल्यानुसार रिफंड फॉर्म भरून, आणि बँकेद्वारे आवश्यक असलेले इतर दुसऱ्या दस्तावेजाद्वारे, कोणत्याही क्षणी कार्ड सरेंडर करू शकतात आणि कार्डमध्ये उपलब्ध फॉरेक्स फंड्सच्या शिल्लकेचा परतावा मिळवू शकतात. सदर परतावा, परताव्याच्या दिवशी प्रचलित लागू चलन विनिमय दरानुसार, फक्त भारतीय रुपयांमध्ये केला जाईल. कार्डामध्ये कोणताही चुकता न केलेला व्यवहार असल्यास, कार्डधारकाला परतावा पूर्ण केला जाण्याआधी तीस (30) दिवसांपर्यंत वाट पाहावी लागेल. कोणत्याही अनधिकृत ठिकाणी किंवा या अटी आणि नियमांमध्ये स्पष्ट केलेल्या उद्देश्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही उद्देश्यासाठी कार्डाचा वापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे आणि यामुळे बँकेद्वारे कार्ड रद्द केले जाऊ शकते. हे कार्ड भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये परकीय चलनातील व्यवहाराकरीता भरणा करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही. कार्ड हरवल्याने किंवा कार्डाच्या अनधिकृत उपयोगामुळे किंवा कार्ड रद्द केल्यामुळे कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, नुकसानासाठी बँक जबाबदार असणार नाही.
5. सदर कार्ड कार्डधारकाला एटीएम मधून रोख स्वरुपात फॉरेक्स फंड काढण्यासाठी आणि/किंवा एटीएममध्ये कार्डातील शिलकेविषयी माहिती निश्चित करण्यास (किंवा पीओएस टर्मिनल्स द्वारे व्यापारी आस्थापनेत पैसे भरण्यासाठी) सक्षम बनवते. कार्डच्या मदतीने भारताबाहेरील एटीएममधून रोख रक्कम काढणे शेयर नेटवर्क द्वारे परवानगी असलेल्या चलनामध्ये होईल, ज्यावर ते एटीएम आहे/ संचालित होते ज्यातून रक्कम काढली गेली आहे. कार्डधारकाचे खाते ज्या चलनात आहे त्याची समतुल्य रक्कम, कोणत्याही अतिरिक्त प्रक्रिया शुल्क, रूपांतरण शुल्क किंवा इतर कोणत्याही शुल्काच्या अधीन, जर अशा व्यवहाराच्या संदर्भात नेटवर्क आंतरराष्ट्रीय नियमांनुसार आकारले जातात, तर बँके द्वारे कार्डधारकाच्या फॉरेक्स फंडमधून कापली जाईल.
6. कार्डधारक आपात्कालीन, वैद्यकीय आणि यात्रा मदतीच्या सेवा आणि बँकेद्वारे वेळोवेळी निर्दिष्ट केल्यानुसार अशाच इतर सेवांचा सुद्धा लाभ घेऊ शकतात. अशा सेवा बँकेच्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही क्षणी मागे घेतल्या, खंडित, रद्द, स्थगित आणि/किंवा समाप्त केल्या जाऊ शकतात.
7. बँक तिच्या उत्पादनांच्या/सेवांच्या संदर्भात, तिच्या विवेकाधिकारानुसार, जसे आवश्यक किंवा गरजेचे असेल त्यानुसार अशा अटीवर आणि बाह्य सेवा पुरवठादार किंवा एजंट्सच्या सेवा वापरू शकते.

कार्डाच्या वापरावर मर्यादा

1. वैयक्तिक कार्डधारकांना जारी केलेले कोणतेही कार्ड बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केल्यानुसार कमाल खर्च मर्यादेच्या अधीन असेल, जे भारतीय रिझर्व बँकेच्या/ बँकेच्या स्वतःच्या वेळोवेळी अंमलात असलेल्या मार्गदर्शक तत्वे आणि लागू कायदे, नियम आणि विनियमांच्या अधीन आहे.
2. बँक अशा मर्यादा/प्रतिबंधांविषयी कार्डधारकाला कळवण्यासाठी किंवा निश्चित करण्यासाठी जबाबदार असणार नाही आणि त्या प्रतिबंध, मर्यादा किंवा एटीएम, शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापनेमध्ये विनंती

केलेल्या व्यवहारांमधील सुसंगततेच्या अभावामुळे कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी उत्तरदायी असणार नाही.

3. बँक कोणत्याही व्यवहारासासाठी प्रति दिवस किंवा विशिष्ट कालावधीसाठी कार्डच्या वापराद्वारे वापरल्या जाणाऱ्या फॉरेक्स फंडाची रक्कम मर्यादित किंवा कमी करण्याचा अधिकार राखून ठेवते. या व्यतिरिक्त, एटीएम, शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापना सुद्धा कार्डच्या वापराद्वारे केल्या जाउ शकणाऱ्या व्यवहाराच्या संख्येवर मर्यादा किंवा प्रतिबंध आणू शकतात. या मर्यादा प्रत्येक एटीएम, शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापनेसाठी वेगवेगळ्या असतील. बँक अशा मर्यादा/प्रतिबंधांविषयी कार्डधारकाला कळवण्यासाठी किंवा निश्चित करण्यासाठी जबाबदार असणार नाही आणि त्या प्रतिबंध, मर्यादा किंवा एटीएम, शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापनेमध्ये विनंती केलेल्या व्यवहारांमधील सुसंगततेच्या अभावामुळे कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी उत्तरदायी असणार नाही.
4. बँक फॉरेक्स फंडाच्या संदर्भात कार्डधारकाला कोणतेही व्याज, भरपाई किंवा कोणतेही लाभ/बोनस देणार नाही आणि फॉरेक्स फंड कार्डधारकाद्वारे बँकेकडे (किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडे) ठेव रक्कम नाही आणि ना ते कार्डधारकाला कोणत्याही ओवरड्राफ्ट/क्रेडिट सुविधेचा अधिकार देतात. कार्डधारकाने वेळोवेळी अंमलात असलेल्या लागू कायदे, नियम आणि विनियमांचे पालन न केल्यामुळे उद्भवलेल्या किंवा संबंधित कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणामी नुकसान किंवा हानिसाठी बँक जबाबदार राहणार नाही. कार्डधारक याद्वारे सर्व दायित्वे, कृती, दावे, देयके आणि किंमती, शुल्क आणि खर्च इत्यादी साठी नुकसानभरपाई देण्यासाठी आणि बँकेला क्षतिपूरित ठरवण्यासाठी सहमत आहे, जे कार्डच्या वापराच्या आणि/किंवा कार्डधारकाने वेळोवेळी लागू असलेले कायदे, नियम आणि विनियमांचे पालन न केल्याच्या परिणामस्वरुप उद्भवतात.
5. वेळोवेळी अंमलात असलेल्या लागू कायदे, नियम आणि विनियमांचे पालन न केल्यामुळे किंवा इतर कारणामुळे कार्ड रद्द झाल्यास (किंवा त्याचा वापर स्थगित केल्यास), कार्डाच्या कोणत्याही वापरासाठी/ वापराच्या प्रयत्नासाठी बँक जबाबदार राहणार नाही, ज्यामुळे कार्डाचा अनादर केला किंवा अस्वीकृत केले जाऊ शकते. रद्द (आणि/ किंवा स्थगित) केलेले कार्ड प्रस्तुत केल्यानंतर ते स्वीकारले जाण्याची जोखिम त्या व्यक्ती आणि/किंवा कार्डधारकाच्या वैयक्तिक क्षमतेमध्ये आहे.

कुणीही व्यक्ती एकाच चलनातील अनेक कार्डांसाठी अर्ज करु किंवा मिळवू शकत नाही. जर कार्डधारकाने, कोणत्याही क्षणी, या अगोदर कार्ड मिळवलेले असेल, तर असे शेवटचे कार्ड जे कार्डधारकाला जारी केलेल आहे ते वैध आणि सक्रिय असेल, जोपर्यंत ते बँकेद्वार रद्द किंवा समाप्त करण्यात आलेले नाही.

स्रोताच्या ठिकाणी कर गोळा करणे (टीसीएस) आर्थिक कायदा, 2020 च्या तरतूदींच्या अंतर्गत लागू आहे. अधिक तपशीलांसाठी, कृपया दिलेल्या लिंकवरील एफएक्यू (नेहमी विचारले जाणारे प्रश्न) पहा : : [फॉरेक्स कार्ड - बहुचलनी पर्यायासह फॉरेक्स ट्रॅवल कार्ड खरेदी करा | आयडीएफसी फर्स्ट बँक]

फॉरेक्स कार्डावर लागू होणारे टीसीएस	
आयकर कायदा 1961 अनुसार, 1 ऑक्टोबर 2020 पासून, बँकेने फॉरेक्स कार्ड आणि वित्तप्रेषणांसह तुमच्या एलआरएस व्यवहारांवर स्रोतावरील कर (टीसीएस) गोळा करणे आवश्यक आहे	
वित्तप्रेषणाचे स्वरुप	**टीसीएस %**
कर्जाद्वारे वित्तपुरवठा केलेले शैक्षणिक खर्च	एक आर्थिक वर्षात ₹ 7 लाखांपेक्षा अधिक वर 0.5%
कर्जाद्वारे वित्तपुरवठा न केलेले शैक्षणिक खर्च	एक आर्थिक वर्षात ₹ 7 लाखांपेक्षा अधिक वर 5%
परदेशातील टूर पॅकेज	फॉरेक्स कार्डामध्ये भरलेल्या संपूर्ण रकमेच्या 5%. टीप : यावर 7 लाखांची मर्यादा नाही, सर्व व्यवहार टीसीएस साठी लागू आहेत.
इतर कोणत्याही हेतूसाठी (वैयक्तिक प्रवास सह)	एक आर्थिक वर्षात ₹ 7 लाखांपेक्षा अधिक वर 5%

व्यवहारांच्या नोंदी आणि विवरणपत्रे

1. एटीएम किंवा शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापन/ ईकॉमर्स संकेतस्थळांवर कार्डधारकाद्वारे व्यवहार पूर्ण केल्यावर, कार्डधारक अशा व्यवहारासाठी वापरलेल्या अशा एटीएम किंवा शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापन आणि/किंवा ई-कॉमर्स संकेतस्थळावर पावती प्राप्त करेल आणि प्राप्त झालेली कोणतीही पावती/नोंद पडताळून घेतल्याची खात्री करेल. अशी पावती/नोंद शिल्लक फॉरेक्स फंड्स दाखवू शकते जेव्हा अशा एटीएम, शेयर्ड नेटवर्क आणि/किंवा व्यापारी आस्थापन आणि/किंवा ई-कॉमर्स संकेतस्थळांवर कार्ड वापरले जाते. कार्डधारक सेल्फ-केयर पोर्टलवर लॉगइन करुन किंवा बँकेच्या ग्राहक सेवेला कॉल करुन सुद्धा उपलब्ध शिल्लक फॉरेक्स फंडच्या संदर्भात माहिती मिळवू शकतो.
2. कार्डधारकाद्वारे सेल्फ-केयर पोर्टलवर लॉग इन करून मासिक व्यवहारांचे विवरणपत्र मिळवले जाऊ शकते, ज्याची विनंती खऱ्या वेळेत प्रक्रिया केली जाईल जे अशा मासिक व्यवहाराच्या विवरणपत्राच्या विनंतीसाठी कोणत्याही उशीर किंवा प्राप्ती न झाल्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँक जबाबदार नसल्याच्या अधीन आहे.

त्रुटी, प्रश्न किंवा तक्रारी

1. कार्डधारक कार्ड किंवा मासिक विवरणपत्र इत्यादीच्या संदर्भात कोणताही प्रश्न किंवा तक्रार असल्यास **बँकेच्या ग्राहक सेवेला 1800 10 888 (भारतात असताना)** किंवा वेळोवेळी बँकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केल्यानुसार संबंधित भौगोलिक ठिकाणच्या टोल फ्री क्रमांकावर कॉल करू शकतो. पुढे कोणत्याही विवाद किंवा कोणत्याही तक्रारीच्या प्रकरणी, बँकेने सदर तक्रार/विवाद किंवा प्रश्नाचा योग्यप्रकारे तपास करुन

उत्तर देण्यासाठी/सोडवण्यासाठी कार्डधारकाने बँकेला लिखितमध्ये संपूर्ण आणि बरोबर तपशील दिला पाहिजे.

2. वर उल्लेखित किंवा कार्डच्या मागील बाजूला असलेला ग्राहक सेवा क्रमांक बँकेच्या विवेकाधिकारानुसार बदलाच्या अधीन आहे.
3. अशा संपर्कासाठी कार्डधारक खालील माहिती पुरवेल :
   i. नाव, पत्ता आणि कार्डधारकाचा कार्ड किट क्रमांक
   ii. व्यवहार आणि/किंवा तक्रारीचे तपशीलवार वर्णन (ज्यामध्ये व्यवहाराची तारीख आणि एटीएम/व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणाचा समावेश आहे) आणि कार्डधारकाने व्यवहारावर विवाद करण्यासाठी किंवा प्रश्न किंवा तक्रार करण्यासाठी आधार किंवा कारण; आणि
   iii. व्यवहाराची रक्कम
4. सदर प्रकरणाच्या तपास किंवा समाधानासाठी बँकेला आणखी कोणतीही माहिती/दस्तावेज आवश्यक असल्यास, कार्डधारक ते पुरवण्यासाठी सहमत आहे. अशा प्रसंगी जेथे कार्डधारकाच्या समाधानानुसार चौकशीचा निपटारा झालेला नाही, बँक कार्डधारकाला लिखित स्वरुपात किंवा इतर प्रकारे त्यांच्या तपासाचे निष्कर्ष आणि/किंवा तक्रारीच्या समाधानाच्या पद्धती, कोणतेही असल्यास, विषयी कळवू शकते.

कार्ड आणि वैयक्तिक ओळख क्रमांक (पिन) ची सुरक्षा

1. कार्डधारकाने पिनची गोपनीयता, सुरक्षा आणि सुरक्षितता राखली पाहिजे आणि लक्षात घ्या कि पिनची गोपनीयता, सुरक्षा किंवा सुरक्षितता ठेवण्यात अयशस्वी ठरल्यामुळे कार्डधारकाला कार्डवर दायित्वे सहन करावी लागू शकतात. कार्डधारक कुणासमोरही आपला पिन उघड करणार नाही आणि एटीएम किंवा पीओएस टर्मिनलवर आपला पिन प्रविष्ट करत असताना इतर कुणीही पाहू नये म्हणून सर्व खबरदारी घेतल्याची कार्डधारक खात्री करेल. शिफारस केली जाते कि कार्डधारकाने आपला पिन लक्षात ठेवावा आणि त्याची कुठेही लिखित नोंद ठेवू नये ज्यामुळे कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीसाठी तो उपलब्ध होण्याची कमीत कमी शक्यता असेल. कोणत्याही परिस्थितीमध्ये किंवा कोणत्याही माध्यमाने मग ते कोणत्याही प्रकारचे असेल किंवा इतर प्रकारे पिन कोणत्याही तिसऱ्या पक्षासमोर उघड केला जाऊ नये ज्यामध्ये बँकेच्या कर्मचारी किंवा व्यापारी आस्थापनेचा समावेश आहे परंतु हे इतकेच मर्यादित नाही.
2. कार्डधारक कार्ड आणि पिनची सुरक्षा राखण्यात अयशस्वी ठरल्यास, कार्डधारकाला कार्डच्या अनधिकृत वापरामुळे होणारे कोणतेही (सर्वच किंवा आंशिक फॉरेक्स फंडाची हानिसह) नुकसान सहन करावे लागू शकते. बँक शिफारस करते कि कार्डधारकाने पिनच्या सुरक्षेसाठी कार्डधारकाला योग्य वाटतील अशा इतर उपायांच्या व्यतिरिक्त खालील खबरदारीं घेतल्या / पालन केल्या पाहिजेत :

   I. कार्डधारकाने कुणालाही पिन उघड करू नये.
   II. कार्डधारकाने एटीएममध्ये पिन प्रविष्ट करत असताना तो कुणीही पाहू नये म्हणून यथायोग्य काळजी घेतली पाहिजे.
   III. कार्डधारकाने पिन लक्षात ठेवून नंतर त्याची कोणतीही नोंद नष्ट केली पाहिजे आणि कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीने/ पक्षाने तो ॲक्सेस करण्यापासून रोखण्यासाठी तो कुठेही लिखित स्वरुपात ठेवू नये.

विमा

सर्व पक्षांनी जोखमींचे कवरेजच्या पद्धती आणि इतर संबंधित आवश्यकतांविषयी समजून घेण्यासाठी या करारावर स्वाक्षरी करण्यासाठी सहमत झाले आहेत ज्यामध्ये इतर प्रकरणांसोबतच, पॉलिसी जारी करणे, दस्तऐवजीकरणात मदत, प्रतिसादांसाठी वेळेची मर्यादा निश्चित करणे, दाव्यांच्या प्रकरणी प्रक्रिया आणि कर्तव्यांचा कालावधी निश्चित करणे, इतर कर्तव्ये/जबाबदाऱ्यांची पुर्तता करणे, विवाद निराकरणावर लक्ष देणे, पॉलिसी मुदतीच्या दरम्यान पत्रव्यवहार/सूचनांच्या संपर्कासाठी विशिष्ट व्यक्तीं निर्धारित करणे इत्यादीचा समावेश असेल परंतु हे इतकेच मर्यादित नाही.

1 पॉलिसी क्र 1901826169/0239780346

2 पॉलिसीचे नाव : फॉरेक्स कार्ड पॉलिसी

3 विमा कंपनीचे नाव : आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

5 पत्ता : आयडीएफसी फर्स्ट बँक, द स्क्वेयर, सी-61, जी ब्लॉक वांद्रे कुर्ला

नुकसानीची सूचना : प्रत्येक नुकसान झाल्यावर किंवा आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या निदर्शनास आल्यावर, योग्य वेळेत विलिस टॉवर इंडिया इंश्युरन्स ब्रोकर प्रायवेट लिमिटेड/ टाटा एआयजीच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे.

डब्ल्यूटीडब्ल्यूला दावा कळवताना खालील तपशीलांची आवश्यकता आहे :

1. फॉरेक्स कार्ड क्रमांक
2. कार्डधारकाचे नाव
3. ₹ मध्ये दाव्याची रक्कम
4. नुकसानीची तारखी/ प्रसंगाची तारीख
5. दाव्याचे स्वरुप
6. नुकसानीचे ठिकाण

दावा कळवण्याचा आणि कागदपत्रे जमा करण्याचा कालावधी :

फसव्या व्यवहाराच्या तारखेपासून 24 तासांच्या आत ब्रोकर/विमा कंपनीला दाव्याची सूचना देणे.

कार्डधारकाने बँकेला सूचना दिल्याच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत दाव्याची कागदपत्रे ब्रोकर/ विमा कंपनीला पाठवायची आहेत.

दाव्यासाठी कागदपत्राची यादी :

फसवणूकीचा आरोप :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ सर्वात अलीकडील खाते विवरणपत्र (नुकसान झालेल्या महिन्याचे).

✓ पासपोर्टची प्रत म्हणजेच पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठासह भारतीय इमिग्रेशनमधून निघण्याच्या स्टँपपासून ते भारतीय इमिग्रेशनमध्ये परत येण्यापर्यंतची कवर करणारी सर्व पृष्ठे.

✓ बँकेचा घटनेचा अहवाल.

✓ ग्राहकाद्वारे बँकेला दिलेले विवाद पत्र.

✓ पोलिस तक्रार/ डायरी एंट्री/ ऑनलाइन तक्रार/ एफआयआर.

एटीएम मध्ये हल्ला आणि दरोडा :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ सर्वात अलीकडील खाते विवरणपत्र (नुकसान झालेल्या महिन्याचे).

✓ पासपोर्टची प्रत म्हणजेच पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठासह भारतीय इमिग्रेशनमधून निघण्याच्या स्टँपपासून ते भारतीय इमिग्रेशनमध्ये परत येण्यापर्यंतची कवर करणारी सर्व पृष्ठे.

✓ बँकेचा घटनेचा अहवाल.

✓ ग्राहकाद्वारे बँकेला दिलेले विवाद पत्र.

✓ पोलिस तक्रार/ डायरी एंट्री/ ऑनलाइन तक्रार/ एफआयआर.

खरेदी संरक्षण :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ सर्वात अलीकडील खाते विवरणपत्र (नुकसान झालेल्या महिन्याचे)

✓ पासपोर्टची प्रत म्हणजेच पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठासह भारतीय इमिग्रेशनमधून निघण्याच्या स्टँपपासून ते भारतीय इमिग्रेशनमध्ये परत येण्यापर्यंतची कवर करणारी सर्व पृष्ठे.

✓ बँकेचा घटनेचा अहवाल.

✓ ग्राहकाद्वारे बँकेला दिलेले विवाद पत्र.

✓ बँकेद्वारे अगोदच्या आणि सध्याच्या पत्त्याचे तपशील.

✓ पोलिस तक्रार/ डायरी एंट्री/ ऑनलाइन तक्रार/ एफआयआर.

✓ नुकसानाच्या दृष्टीकोनातून मूलभूत आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी झालेल्या खर्चाचे इनवॉइस : मूळ (पॉलिसीच्या अटी आणि नियमांनुसार लागू असल्यास).

✓ खरेदी बिलाचा पुरावा : मूळ

✓ खरेदीच्या केलेल्या वस्तूंच्या तपशीलांसह झालेल्या खर्चाचे मूळ इनवॉइस आणि खरेदी दर्शवमारे कार्ड विवरणपत्र.

चेक्ड-इन बॅगेजसाठी उशीर :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ पीआयआर रिपोर्ट - मूळ

✓ चेक्ड-इन बॅगेजचे डिलिवरी न झाल्यासाठी/ अर्धवट डिलिवरीसाठी दिलेल्या नुकसान भरपाईसाठी कॉमन कॅरियरचे व्हाउचर.

✓ चेक्ड-इन बॅगेजची डिलिवरी न झाल्यासाठी/ अर्धवट डिलिवरी संदर्भात कॉमन कॅरियरसोबत केलेल्या, जर कोणतेही, पत्रव्यवहाराच्या प्रति.

✓ मूळ प्रवास तिकीट जे भाडे आणि पैसे भरणाचे तपशील दर्शवते.

✓ परदेशात प्रवेशाच्या स्टँप आणि भारतातून निर्गमनाच्या स्टँप सह पासपोर्ट आणि विजाची प्रत.

✓ एनईएफटी फॉर्म आणि रद्द केलेले धनादेश ज्यामध्ये विमाधारकाच्या/दावेदाराच्या भारतीय बँक खात्याचे तपशील आहेत.

हायजॅक दैनिक भत्ता :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ परदेशात प्रवेशाच्या स्टँप आणि भारतातून निर्गमनाच्या स्टँप सह पासपोर्ट आणि विजाची प्रत.

✓ मूळ प्रवास तिकीट जे भाडे आणि पैसे भरणाचे तपशील दर्शवते.

✓ एनईएफटी फॉर्म आणि रद्द केलेले धनादेश ज्यामध्ये विमाधारकाच्या/दावेदाराच्या भारतीय बँक खात्याचे तपशील आहेत.

चेक्ड-इन बॅगेज हरवणे :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ पीआयआर रिपोर्ट - मूळ

✓ चेक्ड-इन बॅगेजचे डिलिवरी न झाल्यासाठी/ अर्धवट डिलिवरीसाठी दिलेल्या नुकसान भरपाईसाठी कॉमन कॅरियरचे व्हाउचर.

✓ चेक्ड-इन बॅगेजची डिलिवरी न झाल्यासाठी/ अर्धवट डिलिवरी संदर्भात कॉमन कॅरियरसोबत केलेल्या, जर कोणतेही, पत्रव्यवहाराच्या प्रति.

✓ मूळ प्रवास तिकीट जे भाडे आणि पैसे भरणाचे तपशील दर्शवते.

✓ परदेशात प्रवेशाच्या स्टँप आणि भारतातून निर्गमनाच्या स्टँप सह पासपोर्ट आणि विजाची प्रत.

✓ एनईएफटी फॉर्म आणि रद्द केलेले धनादेश ज्यामध्ये विमाधारकाच्या/दावेदाराच्या भारतीय बँक खात्याचे तपशील आहेत

कनेक्टिंग फ्लाइट चुकणे :

✓ दावेदाराद्वारे रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ उशीर झालेल्या विमानाच्या फ्लाइट ऑपरेटरकडून आगमनाची अपेक्षित वेळेची पुष्टी आणि उशीराच्या कारणांसह विमानतळावर आगमनाची वास्तविक वेळ.

✓ सध्याच्या फ्लाइट (चुकलेल्या फ्लाइट) च्या कॅंसलेशनच्या कॉमन कॅरीयरच्या समर्थनासह फ्लाइटसाठी न वापरलेली तिकीटे.

✓ चुकलेल्या फ्लाइटच्या फ्लाइट ऑपरेटरकडून प्रमाणपत्र की चुकलेल्या फ्लाइट द्वारे कवर केलेल्या प्रवासाचे भाडे जप्तीच्या रकमेतून पूर्णपणे किंवा आंशिकपणे जमा करण्यात आले आहे.

✓ चुकलेल्या विमानाद्वारे कवर केलेल्या प्रवासाच्या भागासाठी पर्यायी विमानासाठी (जर प्रवास सुरु ठेवलेला) नव्याने मिळवलेल्या मूळ वापरलेले तिकीट, ज्यामध्ये भाडे म्हणून भरलेली रक्कम दर्शवलेली आहे.

✓ एनईएफटी फॉर्म आणि रद्द केलेले धनादेश ज्यामध्ये विमाधारकाच्या/दावेदाराच्या भारतीय बँक खात्याचे तपशील आहेत.

अपघाती मृत्यू (24 तास) :

✓ नामनिर्देशित व्यक्तीने रीतसर भरलेला आणि सही केलेला क्लेम फॉर्म.

✓ संबंधित एयरलाइन्सकडून पुष्टीकरणाची पावती.

✓ हवाई तिकिटाची प्रत

✓ बोर्डिंग पास, कोणताही असल्यास

कार्ड रिलोड करणे

1. कार्डमध्ये भरलेला फॉरेक्स फंड संपल्यावर, कार्डधारक बँकेच्या शाखेतून किंवा सेल्फ-केयर पोर्टलवरून ऑनलाइन फॉर्म डाउनलोड करुन नोंदणीकृत मेल आयडीद्वारे विनंती करून फॉरेक्स फंड पुन्हा भरू शकतो, जे वेळोवेळी बँकेद्वारे निर्दिष्ट केलेल्या निहित शुल्काच्या भरणाच्या आणि वेळोवेळी लागू असलेल्या सर्व अटी आणि नियम, लागू कायदे, नियम आणि विनियमांच्या पालनाच्या अधीन आहे.

   I. जेव्हा कार्डधारकाला कार्डमध्ये पुन्हा रक्कम भरायची असेल, तेव्हा बँकेने खालीलप्रमाणे अधिकार राखून ठेवलेले आहेत :
      a. कार्डमध्ये भरल्या जाऊ शकणाऱ्या फॉरेक्स फंडाच्या रकमेची मर्यादा निश्चित करणे;
      b. कार्डमध्ये भरल्या जाऊ शकणाऱ्या फॉरेक्स फंडाच्या प्रसंगाच्या संख्येची मर्यादा निश्चित करणे ;
      c. तिच्या विवेकाधिकारानुसार रक्कम पुन्हा भरण्याचा व्यवहार नाकारणे.

कार्डमध्ये रक्कम पुन्हा भरण्याच्या हेतूसाठी, कार्डधारकाने बँकेद्वारे निहित केल्यानुसार फॉर्म पूर्ण करून जमा करणे आणि बँकेला आवश्यकता असेल त्यानुसार कार्डधारक/कार्डाच्या संदर्भात विशिष्ट माहिती पुरवणे आवश्यक आहे. फॉरेक्स फंड्स त्याच/ वेगळ्या चलनात पुन्हा भरले जाऊ शकते ज्यामध्ये कार्ड मूळतः जारी केले गेले होते. पुन्हा भरायची रक्कम लागू वेळोवेळी अंमलात असलेल्या लागू कायदे, नियम आणि विनियमांद्वारे निर्दिष्ट मर्यादेनुसार असेल.

कमाल खर्च मर्यादा

वैयक्तिक कार्डधारकांना जारी केलेले कोणतेही कार्ड बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केल्यानुसार कमाल खर्च मर्यादेच्या अधीन असेल, जे भारतीय रिझर्व बँकेच्या वेळोवेळी अंमलात असलेल्या मार्गदर्शक तत्वे आणि लागू कायदे, नियम आणि विनियमांच्या अधीन आहे.

लागू कायदे, नियम आणि विनियमांचे अनुपालन

1. कार्डधारकाद्वारे कार्डाचा वापर आणि/किंवा ताबा भारतीय रिझर्व बँक द्वारे किंवा वेळोवेळी अंमलात असलेल्या लागू कोणत्याही कायद्यांतर्गत इतर योग्य प्राधिकरणाद्वारे जारी केलेल्या लागू कायदे (यामध्ये भारतीय विनिमय नियंत्रण/परकीय विनिमय व्यवस्थापन कायद्याचा समावेश आहे), नियम, विनियम आणि निर्देशांच्या अनुषंगाने असणे आवश्यक आहे.
2. या व्यतिरिक्त, कार्डाचा वापर कार्ड ज्या देशात वापरले जात आहे त्या देशातील वेळोवेळी लागू असलेल्या कायदे, नियम आणि विनियमांच्या अंतर्गत अशा प्रतिबंध/मर्यादांच्या अधीन आहे.
3. खालीलपैकी कशाचेही उल्लंघन झाल्याच्या प्रकरणी संबंधित प्राधिकरणांसाठी पूर्णपणे कार्डधारक जबाबदार असेल

   i. कार्डधारकाने पिन कार्डावर लिहू नये किंवा इतर प्रकारे दर्शवू नये.
   ii. कार्डधारकाने कार्डासोबत सामान्यपणे घेऊन जात असलेल्या कार्ड ज्यात ठेवलेले आहे अशा कोणत्याही वस्तूवर कोणत्याही प्रकारे सहजपणे ओळखता येईल अशा पद्धतीने पिनची नोंद ठेवू नये, ज्यामुळे कार्डसोबत ती वस्तू हरवण्याची किंवा चोरी होण्याची शक्यता होऊ शकते.
   iii. कार्डधारकाने पिन कार्डासोबत ठेवू नये किंवा इतर कुठेही त्याची नोंद ठेवू नये मग भलेही तो लपवून ठेवलेला असेल.

वरील शिफारसी सर्वसमावेश असण्यासाठी नियोजित नाही. कार्डधारकाने अशी खबरदारी (किंवा इतर उपाय) पाळली/घेतली असली तरीही कोणतीही हानी झाल्यास, अशा नुकसानाची जबाबदारी फक्त कार्डधारकाची असेल. कोणत्याही लागू कायदे, नियम आणि विनियमांच्या उल्लंघनासाठी फक्त कार्डधारक जबाबदार असेल. कार्डधारकाने लागू कायदे, नियम आणि विनियमांचे पालन न केल्यामुळे उद्भवलेल्या किंवा संबंधित कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणामी नुकसान किंवा हानिसाठी बँक जबाबदार राहणार नाही. लागू कायद्यांचे पालन न केल्यामुळे किंवा इतर कारणामुळे कार्ड रद्द झाल्यास (किंवा त्याचा वापर स्थगित केल्यास), कार्डाच्या कोणत्याही वापरासाठी/ वापराच्या प्रयत्नासाठी बँक जबाबदार राहणार नाही, ज्यामुळे कार्डाचा अनादर केला किंवा अस्वीकृत केले जाऊ शकते.

कार्ड किंवा पिन हरवणे किंवा चोरीला जाणे

1. जर कार्डधारकाला विश्वास आहे की कार्ड किंवा पिनचा गैरवापर होत आहे, हरवले आहे किंवा चोरीला गेले आहे किंवा कोणत्याही व्यक्तीला पिन कळला आहे ज्यामुळे कार्डधारकाला वाटते की ते गैरवापर करू शकतात, तर

कार्डधारकाने ताबडतोब कार्ड लॉक करणे आवश्यक आहे ज्यासाठी सेल्फ केयर पोर्टलवर लॉगइन करा >> कार्ड सक्रिय करा/ पहा वर क्लिक करा >> जे कार्ड हरवले आहे ते निवडून लॉक वर क्लिक करा.

2. त्याचप्रमाणे, कार्डधारक कार्ड हॉट लिस्ट करून घेण्यासाठी बँकेच्या ग्राहक सेवेमध्ये बँकेला कळवेल. माहिती देण्याचे हे बंधन कार्डधारकाने स्वीकारलेल्या कोणत्याही उपाययोजनांच्या संदर्भात, वरील शिफारशींच्या अनुषंगाने किंवा पिनशी तडजोड होत असलेल्या पिनच्या सुरक्षेसाठी स्वीकारलेल्या इतर कोणत्याही उपाययोजनांच्या संदर्भात देखील लागू होईल.
3. कार्डधारकाकडून सूचना प्राप्त झाल्यावर, बँकेची ग्राहक सेवा कार्डच्या वापराद्वारे विनंती केलेल्या पुढील व्यवहार होण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करेल आणि हरवलेल्या, चोरी झालेल्या किंवा नुकसान झालेल्या कार्डाचा पुढील वापर रोखण्याता प्रयत्न करेल. कार्ड आणि पिन ब्लॉक केल्यानंतर, कार्डधारक कार्ड पुन्हा वापरू शकत नाही, मग भलेही कार्डधारकाला नंतर ते सापडते.

कार्डधारकाचे दायित्व

कार्डच्या वापराच्या परिणामस्वरुप होणाऱ्या सर्व नुकसानींसाठी कार्डधारक उत्तरदायी असेल ज्यामध्ये याचा सुद्धा समावेश आहे :

1. अशी परिस्थिती जिथे कार्ड आणि/ किंवा पिनच्या वापराद्वारे कथित अनधिकृत व्यवहार झालेला आहे किंवा
2. अशी परिस्थिती जिथे कार्ड आणि/किंवा पिनचा कथित गैरवापर झाला आहे, हरवले आहे, आणि असे दायित्व तोपर्यंत कायम राहते जोपर्यंत ;

   (i) कार्ड आणि/ पिनच्या वापराद्वारे झालेल्या अशा अनधिकृत व्यवहाराची सूचना बँकेला दिलेली नाही, आणि

   (ii) बँक कार्ड आणि/किंवा पिनचा पुढील वापर यशस्वीरित्या बंद करत नाही.

बँकेचे उत्तरदायित्व वगळणे

1. कार्ड आणि/किंवा पिनच्या वापरामुळे झालेल्या अशा अनधिकृत व्यवहारांचे आणि कार्ड आणि/किंवा पिनचा इतर प्रकारे गैरवापर झाल्यास, हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास उत्तरदायित्व बँकेचे नसणार.
2. बँकेची सर्वच कारवाई, दावे, मागण्या, कार्यवाही, नुकसान, हानी, वैयक्तिक इजा (ज्यामध्ये वास्तविक किंवा कथित प्रतिष्ठेची हानी, मानहानी किंवा अशा बाबींचा समावेश आहे), किंमती, शुल्क आणि खर्चांच्या संदर्भात कार्डधारकाच्या प्रति कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही जे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे खालील बाबींमुळे उद्भवले आहेत :

   I. कार्ड आणि/किंवा पिनचा कोणताही वापर;

   II. कार्डचा आदर करण्यात किंवा स्वीकारण्यात कोणत्याही व्यक्ती किंवा व्यापारी आस्थापनेद्वारे नकार,

   III. कोणतेही एटीएम/ पीओएस टर्मिनन जे बिघडले आहे किंवा इतर प्रकारे कामात नाही, आणि परिणामी असे टर्मिनल कार्ड आणि/किंवा पिन किंवा इतर प्रकारे स्वीकारत नाही आहे;

   IV. कार्डधारकासह कोणत्याही व्यक्ती द्वारे कार्डाचा गैरवापर किंवा फसवा वापर;

   V. कार्ड परत/रद्द करण्याची विनंती करणारे कोणत्याही व्यक्तीद्वारे केलेले कोणतेही विधान किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे संयुक्तपणे केले गेलेले कोणतेही कार्य;

VI. मेंबर द्वारे बँकेच्या आवारात बँकेच्या नियुक्त कर्मचाऱ्यांशिवाय इतर व्यक्तींना कार्ड सुपूर्द करणे;

VII. कार्डच्या दर्शनी भागावर नमूद समाप्ती तारखेच्या आधी ते परत करण्याची मागणी करण्याचा आणि प्राप्त करण्याच्या आपल्या अधिकाराचा प्रयोग, मग भलेही अशी मागणी आणि समर्पण बँक किंवा इतर कोणत्याही व्यक्ती किंवा एटीएम/ पीओएस टर्मिनल द्वारे केलेली आणि/किंवा मिळवलेली असेल,

VIII. बँकेद्वारे कोणतेही कार्ड समाप्त करण्याच्या आपल्या अधिकाराचा प्रयोग;

IX. कार्ड पुन्हा ताब्यात घेण्याचे/ रद्द करण्याचे आणि/किंवा ते परत करण्याची विनंती;

X. बँकेसमोर उघड केलेल्या कोणत्याही तपशीलांमध्ये कोणतेही खोटे वर्णन, विपर्यास, त्रूटी किंवा हयगय;

XI. असे कार्ड परदेशी चलन विनिमय लाभांची मर्यादा ओलांडल्याने कार्ड आणि/किंवा पिनच्या प्रक्रिया करण्यावर नकार,

XII. जेव्हा एकतर बँकेद्वारे किंवा बँकेच्या वतीन कार्यरत कोणत्याही व्यक्तीद्वारे कार्डधारकाकडून थकबाकीची/ फॉरेक्स फंडात प्राप्त झालेल्या जादा निधीची पूर्तता करण्याची मागणी किंवा दावा केला जातो;

XIII. कार्डाचा वापर आणि/किंवा फॉरेक्स फंडाची उपलब्धता समाप्त, स्थगित, ब्लॉक केल्यावर किंवा नाकारल्यावर, इतर गोष्टींसोबतच, जेव्हा हे निश्चित करणे आवश्यक होते कि कुणीही व्यक्ती शिल्लक फॉरेक्स फंड प्राप्त करण्यासाठी/ कार्ड वापरण्यासाठी आणि/किंवा लागू कायदे, नियम आणि विनियम किंवा कोणत्याही योग्य अधिकाऱ्याच्या निर्देशांद्वारे आवश्यक इतर कोणतेही पावलं उचलण्यासाठी योग्यप्रकारे हक्कदार आहे किंवा नाही.

कार्डमध्ये भरायच्या फॉरेक्स फंडापेक्षा जादा निधीची प्राप्ती

जर कार्डधारकाला फॉरेक्स फंडापेक्षा जादा निधी प्राप्त झाला असेल तर कार्डधारक असा कोणताही निधी बँकेद्वारे निर्दिष्ट केलेल्या अशा नियम आणि अटींनुसार त्याची आयडीएफसी फर्स्ट बँकेला ताबडतोब परतफेड करण्यासाठी सहमत आहे.

बँकेला असा विश्वास ठेवण्याचे कारण आहे की कार्डधारकाने विनंती केलेल्या फॉरेक्स फंडापेक्षा जादा रक्कम कार्डधारकाला, कोणत्याही कारणास्तव, प्राप्त झालेली आहे (यामध्ये एटीएम, पीओएस किंवा इतर उपकरण, किंवा बँक प्रणालीमध्ये बिघाडाचा समावेश आहे), बँक याची कार्डधारकाला सूचना देईल आणि बँक निर्दिष्ट करेल अशा कोणत्याही अटी आणि नियमांनुसार कार्डधारकाला प्राप्त झालेला जादा निधी फॉरेक्स फंडातून कापून घेईल.

पुढे बँकेने स्वतःकडे किंवा तिच्या कोणत्याही ग्रूप कंपन्यांकडे असलेल्या कार्डधारकाच्या कोणत्याही खात्यातून असा जादा निधी वसूल करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे, मग सदर खाते संयुक्त खाते किंवा एकल किंवा इतर प्रकारचे असेल, किंवा आणि/किंवा सूचना दिल्यावर अशा जादा निधीचा कार्डधारकाने, बँक निर्दिष्ट करेल अशा अटी आणि नियमांनुसार, ताबडतोब भरणा करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. जेव्हा एकतर बँकेद्वारे किंवा बँकेच्या वतीन कार्यरत कोणत्याही व्यक्तीद्वारे कार्डधारकाकडून थकबाकीची/ फॉरेक्स फंडात प्राप्त झालेल्या जादा निधीची पूर्तता करण्याची मागणी किंवा दावा केला जातो, कार्डधारक कार्डावरील संपूर्ण

थकीत रक्कम आणि/किंवा फॉरेक्स फंडात प्राप्त झालेला जादा निधी बिनशर्त बँकेला भरेला. या अटी आणि नियमांच्या अंतर्गत कोणतीही बाब कायद्याच्या अंतर्गत किंवा बँक आणि कार्डधारकाच्या दरम्यान अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही कराराच्या वेळेपासून बँकेच्या धनाच्या ग्रहणाधिकार, सेट-ऑफ, हस्तातंरण आणि वापराच्या अधिकाराला प्रभावित करणार नाही.

विवाद

कार्डधारकाने सही केलेली आणि भरणासाठी व्यापारी आस्थापनेकडून प्राप्त झालेली कोणतीही भरणा चिट्ठी किंवा इतर भरणा मागणीपत्र या गोष्टीचा निर्णया पुरावा असेल कि अशा भरणा चिट्ठी किंवा इतर मागणीपत्रावर नमूद केलेली रक्कम कार्डधारकाद्वारे कार्डाच्या वापराद्वारे योग्यप्रकारे खर्च केलेली होती, फक्त अशा भरणा चिट्ठी किंवा इतर मागणीपत्र वगळून, जो कार्डधारकाद्वारे बँकेला कार्डाच्या वापराद्वारे अनधिकृत व्यवहार झाल्याचे आणि/किंवा इतर प्रकारे पिनचा गैरवापर झाल्याचे, हरवल्याचे किंवा चोरीला गेल्याचे कळवले गेल्याच्या आणि बँकेने असे कार्ड आणि/किंवा पिन यशस्वीरित्या ब्लॉक केल्याच्या नंतरच्या तारखेला झालेला आहे.

जर कार्डधारक त्याच्या विवरणपत्रात दर्शवलेल्या कोणत्याही शुल्क/रकमेशी असहमत होऊ इच्छितो, तर त्याला व्यवहाराच्या तारखेपासून 30 (तीस) दिवसांच्या आत बँकेला याची सूचना द्यावी लागेल, अन्यथा असे मानले जाईल की सर्व शुल्क/ रक्कम आणि विवरणपत्र पूर्णपणे बरोबर आणि कार्डधारकाला मान्य आहेत. इतर कोणत्याही प्रकरणात, जर कार्डधारकाला वाटते की कोणतीही रक्कम चूकीच्या पद्धतीने फॉरेक्स फंडातून कापली गेलेली आहे, तर कार्डधारकाने याची बँकेला ताबडतोब सूचना द्यायला हवी, जर नंतरची तपासणी पूर्ण झाल्यावर, बँक याविषयी समाधानी आहे की शुल्क योग्यप्रकारे कार्डधारकाच्या फॉरेक्स फंडातून कापले गेलेले, बँक त्यानंतरच्या विवरणपत्रात कोणत्याही फी किंवा इतर रकमेसह सदर शुल्क पुन्हा लागू करेल.

आयडीएफसी फर्स्ट बँक कडून वस्तू आणि सेवा इत्यादीच्या गुणवत्तेच्या संदर्भात कोणतेही प्रतिनिधित्व, हमी इत्यादी नाही

बँक कोणत्याही व्यक्तीसोबत/कडे व्यापारी आस्थापनेसह कार्डाच्या वापराद्वारे खरेदी केलेल्या/ खरेदी करायचा प्रस्ताव केलेल्या/ भाड्याने घेतलेल्या वस्तूंच्या किंवा इतर प्रकारे आणि/किंवा लाभ घेतलेल्या/ लाभ घेण्यासाठी प्रस्तावित सेवांच्या गुणवत्तेविषयी किंवा वस्तूच्या/सेवांच्या वितरणात कोणत्याही विलंबासाठी, वस्तू/सेवांच्या बिगर-वितरणासाठी, किंवा कोणत्याही व्यक्तीसोबत/कडे व्यापारी आस्थापनेसह कार्डाच्या वापराद्वारे सदोष/हलक्या दर्जाच्या वस्तू/सेवांच्या प्राप्तीसाठी कार्डधारकाला (किंवा कार्डधारकाद्वारे किंवा अंतर्गत दावा केलेल्या कोणत्याही व्यक्तीला) कोणतेही प्रतिनिधित्व करत आणि/किंवा हमी देत नाही किंवा इतर प्रकारे कार्डधारकाला (किंवा कार्डधारकाद्वारे किंवा अंतर्गत दावा केलेल्या कोणत्याही व्यक्तीला) खात्री देत नाही.

कोणत्याही व्यक्तीसोबत/कडे व्यापारी आस्थापनेसह कार्डाच्या वापराद्वारे खरेदी केलेल्या/ खरेदी करायचा प्रस्ताव केलेल्या/ भाड्याने घेतलेल्या वस्तूंच्या किंवा इतर प्रकारे आणि/किंवा लाभ घेतलेल्या/ लाभ घेण्यासाठी प्रस्तावित सेवांच्या गुणवत्ता किंवा वस्तूच्या/सेवांच्या वितरणात कोणत्याही विलंब, वस्तू/सेवांच्या बिगर-वितरण, किंवा

कोणत्याही व्यक्तीसोबत/कडे व्यापारी आस्थापनेसह कार्डाच्या वापराद्वारे सदोष/हलक्या दर्जाच्या वस्तू/सेवांच्या प्राप्तीच्या संदर्भातील विवाद किंवा दावे कार्डधारकाने (किंवा कार्डधारकाद्वारे किंवा अंतर्गत दावा करत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने) बँकेच्या कोणत्याही संदर्भाशिवाय सदर व्यक्ती/व्यापारी आस्थापनांसोबत परस्पर सोडवले पाहिजेत.

आपात्कालीन वैद्यकीय आणि फॉरेक्स मदत आणि इतर सेवांच्या संदर्भात बँकेचे अस्वीकरण.

बँक, कार्डसोबत अशा आपात्कालीन वैद्यकीय आणि फॉरेक्स मदत आणि कंसीयजच्या सेवा पुरवठादारांद्वारे दिलेल्या सेवांसाठी किंवा सेवांच्या वितरणातील उशीरासाठी, सेवांच्या बिगर-वितरण किंवा सदोष/ हलक्या दर्जाच्या सेवांच्या प्राप्तीसाठी जबाबदार नसेल आणि पुढे, सेवा पुरवठादारांद्वारे दिलेल्या सेवांमुळे किंवा सेवांच्या वितरणातील उशीरामुळे, सेवांच्या बिगर-वितरण किंवा सदोष/ हलक्या दर्जाच्या सेवांच्या प्राप्तीमुळे कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही कारवाई, दावे, मागणी, कार्यवाही, हानी, नुकसान, वैयक्तिक इजा (यामध्ये प्रतिष्ठेची वास्तविक किंवा कथित नुकसान, मानहानी किंवा अशा बाबींचा समावेश आहे), किंमती शुल्क आणि खर्चासाठी बँक उत्तरदायी असणार नाही.

या आपात्कालीन वैद्यकीय आणि फॉरेक्स मदत आणि इतर सेवा सध्या भारत, नेपाळ आणि भूतामध्ये उपलब्ध नाहीत. या आपात्कालीन वैद्यकीय आणि फॉरेक्स मदत आणि इतर सेवा हस्तांतरणीय नाहीत आणि फक्त कार्डधारकासाठी उपलब्ध आहेत. सेवा पुरवठादारांद्वारे या सेवा पुरवण्याआधी ओळख पडताळणी करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

जिथे कुठे लागू असेल, अशा आपात्कालीन वैद्यकीय आणि फॉरेक्स मदतीसाठी आणि इतर सेवांसाठी लागू खर्च, शुल्क आणि फी कार्डधारकाला अशा सेवांचा लाभ घेण्याआधी कळवल्या जातील आणि त्यानंतर फॉरेक्स फंडातून कापल्या जातील. कोणत्याही आपात्कालीन वैद्यकी आणि फॉरेक्स मदत आणि इतर सेवा पुरवण्याच्या परिस्थितीमध्ये, ज्यांच्यासाठी सेवा पुरवठादाराला भरणा करण्याची आवश्यकता आहे, अशा सेवांची तरतूद/ अशा सेवांसाठी भरणा करणे सेवा पुरवठाद्वारे अगोदर कार्डधारकाच्या कार्ड द्वारे किंवा कार्डधारकाच्या कुटुंबाकडून भरणा वसूल करण्याच्या अधीन आहे. या सेवांची मागणी करणाऱ्या कार्डधारकांना हे कळवण्याची कार्डधारक खात्री करेल कि सेवांच्या संदर्भात सर्व तृतीय पक्षाच्या खर्चासाठी कार्डधारक पूर्णपणे जबाबदार असेल. कोणत्याही तिसऱ्या पक्षाद्वारे आकारलेल्या कोणत्याही खर्च, शुल्क, फी आणि/किंवा खर्चासाठी बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाही, जी पूर्णपणे कार्डधारकाची जबाबदारी असेल.

कार्डधारकाचे नुकसानभरपाईचे दायित्व.

बँकेद्वारे कार्डधारकाला कार्ड आणि संबंधित सेवा पुरवण्याच्या बदल्यात, कार्डधारक बँकेला सर्व कारवाई, दावे, मागणी, कार्यवाही, हानी, नुकसान,वैयक्तिक इजा, किंमती (कायदेशीर खर्चासह), शुल्क आणि खर्चांची नुकसान भरपाई देण्यासाठी आणि नुकसान भरपाईपासून बँकेला क्षतिपूरत ठेवण्यासाठी सहमत आहेत जे बँकेला कोणत्याही कारणांमुळे किंवा कोणत्याही क्षणी उचलावे, सहन करु किंवा द्यावे लागू शकतात.

कार्डधारक याद्वारे सर्व दायित्वे, देय नुकसान, दंड, कृती, दावे, आणि किंमती, शुल्क आणि खर्च इत्यादी साठी नुकसानभरपाई देण्यासाठी आणि बँकेला क्षतिपूरित ठरवण्यासाठी सुद्धा सहमत आहे, जे कार्डधारकाने वेळोवेळी लागू असलेले कायदे, नियम आणि विनियमांचे पालन न केल्याच्या परिणामस्वरुप उद्भवतात.

खर्च, शुल्क आणि फी

कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि मान्य करतो :

1. कि कार्ड जारी केल्याच्या किंवा वापराच्या संदर्भात लागू होणारे सर्व खर्च, शुल्क आणि फी कार्डधारकाच्या फॉरेक्स फंडातून आपोआप कापले जाऊ शकतात. सध्या अंमलात असलेल्या खर्च, शुल्क आणि फीचे तपशील कार्डधारकाला दिलेल्या कार्ड किटमध्ये किंवा शुल्कांच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केल्यानुसार, जे कोणतेही लागू होते, उपलब्ध आहेत. सदर खर्च, शुल्क आणि फी वेळोवेळी बँकेद्वारे बदलाच्या अधीन आहेत आणि बँकेच्या कॉल सेंटरला कॉल करुन सर्वात नवीन लागू खर्च, शुल्क आणि फीची निश्चित केली जाऊ शकते. शुल्कांमधील बदल फॉरेक्स कार्ड - बहुचलनी पर्यायासह फॉरेक्स ट्रॅवल कार्ड खरेदी करा | आयडीएफसी फर्स्ट बँक वर सुद्धा प्रदर्शित केले जातील.
2. की खर्च, शुल्क आणि फीमध्ये पैसे काढण्याची फी आणि चलन रूपांतरण दर समाविष्ट आहेत आणि यामध्ये तिसऱ्या पक्षांद्वारे आवश्यक असलेल्या पुढील/अतिरिक्त शुल्क/फी किंवा इतर बाबी समाविष्ट असू शकतात.

3. कि पैसे काढण्याची फी लागू आहे आणि कार्डधारकाद्वारे एटीएममधून पैसे काढण्याच्या प्रत्येक प्रसंगासाठी फॉरेक्स फंडातून ती कापली जाईल, जी बँकेद्वारे वेळोवेळी प्रकाशित केलेल्या शुल्कांच्या अनुसूचीच्या अधीन आहे.

4. याच्या व्यतिरिक्त, शेयर्ड नेटवर्कच्या मालक/संचालकांद्वारे मूल्यमापन केल्यानुसार आणि लागू केलेले खर्च/ शुल्क/ फी किंवा इतर बाबी सुद्धा लागू होतील आणि शेयर्ड नेटवर्कमध्ये समाविष्ट एटीएम मधून पैसे काढण्याच्या प्रत्येक प्रसंगासाठी फॉरेक्स फंडातून कापली जाईल.

5. जर कार्डधारक त्याला ज्या चलनात कार्ड जारी करण्यात आलेले त्याच्या व्यतिरिक्त इतर चलनात फॉरेक्स फंड प्राप्त करतो, तर रूपांतरण दरात अतिरिक्त 3.5% ने वाढ होईल व जीएसटी लागू होईल (किंवा अशा अधिक/इतर दर जो बँक वेळोवेळी निर्दिष्ट करू शकते) आणि तो फॉरेक फंडातून कापला जाईल. असा दर कार्डधारकाच्या संमतीशिवाय बँकेद्वारे बदलला किंवा सुधारला जाऊ शकतो आणि असा बदललेला किंवा सुधारलेला दर सुद्धा लागू होईल आणि फॉरेक्स फंडातून कापला जाईल. रूपांतरण दराचे तपशील 'चलन रूपांतरण दर' नामक कलमात स्पष्ट केलेले आहेत.

6. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा असे खर्च, शुल्क आणि फी कापण्यासाठी फॉरेक्स फंड पुरेसा नाही, तो थेट कार्डधारकाकडून आणि/किंवा कार्डधारकाद्वारे बँककडे किंवा तिच्या समूह कंपन्यांकडे ठेवलेल्या कोणत्याही

खात्यातून (संयुक्त खात्यांसह) वसूल करण्याचा आणि पुढे, कार्डाच्या वापराद्वारे कोणतेही पुढील व्यवहार नाकारण्याचा/ स्वीकार न करण्याचा किंवा ब्लॉक करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

7. कार्डाच्या वापराच्या परिणामस्वरुप देय असलेल्या शुल्क किंवा करांसह कोणतीही वैधानिक आकारणी कार्डधारकाची जबाबदारी असेल आणि जर बँकेकडून लादले गेले/ वसूल करायची/ वसूल करण्याची मागणी केली गेली असल्यास (एकतर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे), अशी वैधानिक आकारणी फॉरेक्स फंडातून कापली जाईल आणि/किंवा थेट कार्डधारकाकडून आणि/किंवा कार्डधारकाद्वारे बँकेकडे किंवा तिच्या कोणत्याही समूह कंपन्यांकडे ठेवलेल्या कोणत्याही खात्यातून (संयुक्त खात्यांसह) वसूल केली जाईल. चलन रूपांतरणावरील लागू जीएसटी, स्रोतावर कापला जाणारा कर (टीसीएस) आणि इतर कर व्यवहाराच्या तारखेच्या त्याच दिवशील तुमच्या खात्यातून कापला जाईल.

8. बँकेला जर पाकीटातून मर्यादेपेक्षा जादा रक्कम काढली असेल/ अपुरी रक्कम असेल किंवा कार्डधारकाच्या खात्यातील ठेवींवर, मग ते एकट्याच्या नावे किंवा संयुक्त नावे असेल, सध्या किंवा भविष्यात, इतर कोणत्याही धारणाधिकार किंवा शुल्कांचा विचार न करता, खात्यावर वजावट/ग्रहणाधिकार लागू असेल तर ग्राहकाद्वारे परदेशात लाभ घेतलेल्या सेवांच्या परिणामस्वरुप उद्भवणाऱ्या, जे कोणतेही, सर्व थकबाकी देय ग्राहकाकडून वसूली करण्याचा अधिकार असेल.

चलन रूपांतरण दर

अशा परिस्थितीमध्ये जेथे ज्या चलनात कार्ड जारी करण्यात आलेले त्यापेक्षा वेगळ्या चलनात फॉरेक्स फंड प्राप्त केले आहे (किंवा त्यानंतर आकारले आहे), तर फॉरेक्स फंड प्रचलित तारखेच्या चलन रूपांतरण दराने अशा नवीन चलनात रूपांतरित केले जाईल. कार्डधारकाने ज्या चलनात कार्ड जारी करण्यात आलेले त्यापेक्षा वेगळ्या चलनातून एटीएम मधून फॉरेक्स फंड काढण्याच्या (किंवा त्यानंतर आकारण्याच्या) परिस्थितीचा यामध्ये समावेश असेल.

चलन रूपांतरण दर ती रक्कम असेल जी असा व्यवहार प्रक्रिया केल्याच्या वेळेला अंमलात असलेल्या नेटवर्क आंतरराष्ट्रीय धोरण आणि प्रक्रियांनुसार कार्डाच्या चलनातून नवीन चलनात रूपांतर करण्यासाठी फॉरेक्स फंडातून कापली जाईल.

सध्या, विसा सक्षम कार्डांसाठी, विसा आंतरराष्ट्रीय धोरण आणि प्रक्रिया इतर गोष्टींच्या सोबत याचे प्रावधान करते कि जेथे व्यवहार त्याच दिवशी प्रक्रिया केला गेला आहे (फॉरेक्स फंड काढून किंवा इतर प्रक्कारे), वापरला जाणारा चलन रूपांतरण दर यापैकी एक असेल :

I. प्रक्रिया करण्याच्या एक दिवस अगोदर प्रभावी असलेला घाऊक बाजार दर, किंवा
II. प्रक्रिया करण्याच्या एक दिवस अगोदर प्रभावी सरकार-आदेशित दर; जो विसा इंटरनॅशनल द्वारे वेळोवेळी स्थापित फी द्वारे कोणत्याही प्रकरणात वाढवला जाईल.

अगोदरच्या भागात निर्दिष्ट केल्याप्रमाणे, बँक अतिरिक्त चलन रूपांतरण दर/फी आकारते जी सध्या 3.5% अधिक लागू जीएसटी आहे (आणि हा असा उच्च/इतर दर असू शकतो जो बँक वेळोवेळी निर्दिष्ट करू शकते) आणि हा फॉरेक्स फंडातून कापला जाईल. हा चलन रूपांतरण दर/शुल्क/किंमत/शुल्क किंवा अन्यथा विसा इंटरनॅशनलच्या आवश्यकतेनुसार वरील संदर्भात वेगळा आहे.

अस्वीकृती

I. कार्डधारक मान्य करतो कि त्याच्या/तिच्या कार्ड सुविधांच्या वापराविषयीची माहिती बँक आणि अशा सुविधा देणाऱ्या आर्थिक संस्थांमध्ये दिली-घेतली जाते.
II. कार्डसाठी अर्ज स्वीकारणे कार्डधारकाच्या पत पात्रतेच्या प्रतिकूल नसण्याच्या अहवालांवर आधारित आहे.
III. बँक फॉरेक्स कार्डमधील कोणत्याही कसूर विषयी किंवा कार्डधारकाची फॉरेक्स कार्ड सुविधा मागे घेण्याविषयी इतर बँका आणि आर्थिक संस्थांना कळवू शकते.
IV. प्रतिकूल अहवालांची प्राप्तीच्या झाल्यावर (कार्डधारक किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या पत पात्रतेच्या संदर्भात), बँक, लेखी 15 दिवसांच्या पूर्वसूचनेनंतर, फॉरेक्स कार्ड रद्द करू शकते, फॉरेक्स कार्ड संदर्भातील संपूर्ण थकीत रक्कम तसेच फॉरेक्स कार्डच्या वापराद्वारे आलेले पुढील कोणतेही शुल्क, जे कदाचित अजूनही फॉरेक्स कार्डात बिल केलेले नसतील, कार्डधारकाद्वारे ताबडतोब भरणा करायचे असतील.
V. बँक कार्डधारकाला बँक किंवा आर्थिक संस्थेचे नाव उघड करण्यासाठी बांधील नाही, जेथून त्यांना ही माहिती मिळाली आहे किंवा ज्यांनी ही माहिती उघड केलेली.

कार्डचा वापर/ फॉरेक्स फंडाशी पोच समाप्त/ स्थगित करण्याचा/ नाकारण्याचा अधिकार

खालीलपैकी कोणतीही घटना घडल्यास कार्डचा वापर/ फॉरेक्स फंडाशी पोच, तात्पुरते किंवा कायमस्वरुपी, समाप्त/ स्थगित करण्याचा/ नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे :

i. इथे दिलेल्या अटींचे पालन करण्याच अशस्वी होणे.
ii. कार्डधारक कोणत्याही दिवाळखोरी, नादारीची कार्यवाही किंवा कार्यावाहींच्या किंवा अशाच प्रकारच्या कार्यवाहीचा विषय बनतो.
iii. कार्डधारकाचे निधन,
iv. जेव्हा हे निश्चित करणे आवश्यक बनते कि कुणीही व्यक्ती फॉरेक्स फंड प्राप्त करण्यासाठी/ कार्डच्या वापरासाठी योग्य हक्कदार आहे किंवा नाही आणि/किंवा
v. लागू कायदे, नियम आणि विनियम किंवा कोणत्याही योग्य प्राधिकरणाच्या निर्देशानुसार इतर कोणतीही पावलं उचलण्यासाठी.

इथे काहीही दिले असले तरीही, बँक कोणत्याही वेळी, कोणतीही सूचना किंवा कारण न देता, सर्वच किंवा कोणत्याही सेवा किंवा कार्डधारकाद्वारे त्यांचा वापर स्थगित किंवा समाप्त करू शकते. या अटी आणि नियमांच्या सर्व तरतूदी ज्या त्यांचा हेतू प्रभावी बनवण्यासाठी सेवांच्या आणि/किंवा कार्डधारकाद्वारे सेवांचा वापर स्थगित किंवा समाप्त करण्यानंतर सुद्धा लागू राहतील आणि कार्ड स्थगित किंवा समाप्त केल्यानंतर सुद्धा पूर्णपणे अंमलात आणि लागू राहतील. अशी स्थगिती किंवा समाप्ती असली तरीही, कार्डधारकाने पूर्ण

करायच्या किंवा मुक्त करायच्या बाकी असलेल्या कोणत्याही दायित्वे किंवा जबाबदाऱ्यांच्या संदर्भात कार्डधारक या अटींशी बांधील असणे सुरु राहील.

सरकारी कायदा आणि अधिकारक्षेत्र

या अटी आणि नियम तसेच कार्डधारकाद्वारे कार्डचा वापर सुद्धा भारतीय कायदे, नियम आणि विनियमांनुसार नियंत्रित केले जाईल. सर्व विवाद केवळ मुंबई, भारतातील न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील.

पक्षकार (म्हणजेच कार्डधारक आणि बँक) याद्वारे सहमत आहेत की कार्डधारकाने (आणि/किंवा कार्डधारकाद्वारे किंवा वतीने दावा करणारे कुणीही व्यक्ती) दाखल केलेल्या कार्डच्या या अटी व नियमांमधून उद्भवणारा कोणताही दावा, कायदेशीर कारवाई किंवा कार्यवाही भारतातील मुंबई येथील न्यायालये किंवा न्यायाधिकरणांमध्ये आणली जाईल आणि सदर पक्ष अवैकल्पिकपे अशा न्यायालये आणि न्यायाधिकरणांच्या अधिकारक्षेत्रात स्वतःला सादर करतील.

विभक्तता आणि सूट

या अटी आणि नियमांमधील प्रत्येक तरतूद एकमेकांपासून विभक्त आणि वेगळी आहे आणि जर कोणत्याही वेळी, अशी एक किंवा अनेक तरतूदी कोणत्याही अधिकारक्षेत्राच्या कायद्यांच्या अंतर्गत कोणत्याही संदर्भात बेकायदेशीर किंवा अंमलात न आणण्याजोगी आहे किंवा बनते, तर उर्वरित तरतूदींचा कायदेशीरपणा, वैधता किंवा अंमलात आणण्याची क्षमता कोणत्याही प्रकारे प्रभावित होणार नाही.

बँकेच्या कोणत्याही कृती, उशीर किंवा हयगयीचा या अटी आणि नियमांच्या अंतर्गत तिच्या अधिकार, क्षमता किंवा उपाययोजना किंवा अशा अधिकार, क्षमता किंवा उपाययोजनांच्या तिच्या पुढील अंमलबजावणीर कोणताही परिणाम होणार नाही. या अटी आणि नियमांच्या अंतर्गत असलेले अधिकार आणि उपाययोजना एकत्रित आहेत आणि कायद्याद्वारे दिलेल्या इतर अधिकार आणि उपाययोजनांपेक्षा वेगळे नाहीत.

नेमणूक

कार्डधारक मान्य करतो कि बँक कार्डधारकाची संमती न मिळता तिच्या विवेकाधिकारानुसार तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे फॉरेक्स कार्ड संदर्भात तिचे कोणतेही किंवा सर्वच अधिकार आणि दायित्वे कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला सोपवू, हस्तांतरित किंवा देऊ शकते.

विविध

बँक कार्डधारकांना काही सुविधा, सदस्यत्व आणि सेवा तिला योग्य वाटेल अशा फी मध्ये आणि अशा अटी आणि नियमांवर देण्याचा अधिकार राखून ठेवते. इथे काहीही दिलेले असले तरीही, फीमध्ये सवलत देण्याचा किंवा कमी करण्याचा आणि कार्डधारकाला पूर्वसूचना देऊन आणि त्याच्या प्रति कोणत्याही दायित्वाशिवाय कोणत्याही वेळी असा लाभ मागे घेण्याचा अधिकार बँक राखून ठेवते. या अटी व नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कार्ड सदस्यत्व रद्द केल्याने अशा सुविधा आणि सेवा आपोआप संपुष्टात येतील. बँक, किंवा व्यापारी आस्थापना किंवा इतर कोणतेही तिसऱ्या पक्षाद्वारे अशा सुविधा, सदस्यत्व किंवा सेवांची अंमलबजावणी करण्यात कोणत्याही प्रकारच्या दोष किंवा उल्लंघन किंवा अंमलबजावणी न झाल्याच्या परिस्थितीमध्ये, बँक, कोणत्याही प्रकारे, कार्डधारकाच्या प्रति उत्तरदायी असणार नाही.

बँक, कार्डधारकाच्या अर्ज आणि सर्वेक्षणांच्या दरम्यान त्याने दिलेली माहिती, बाह्य स्रोतांकडून मिळालेली माहिती, ज्यामध्ये ग्राहक अहवालांचा समावेश आहे, मार्केटिंग अहवाल आणि बँक/ संलग्न संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या क्रियाकलापांसाठी वापरण्याचा अधिकार राखून ठेवते, बँक ही माहिती मेलिंग लिस्ट तयार करण्यासाठी वापरू शकते जी अशा कंपन्यांद्वारे वापरली जाऊ शकते ज्यांच्यासोबत बँक कार्डधारकासाठी मार्केटिंग ऑफर्स तयार करण्यासाठी काम करेल.

बँक वेळोवेळी कार्डवर दिली जाणारी धोरणे, वैशिष्ट्ये आणि लाभ सुधारण्याचा अधिकार राखून ठेवते. कार्ड सदस्य अशा सुधारणा/बदलांद्वारे तोपर्यंत बांधील असेल जोपर्यंत अशा सुधारणा/बदल करण्याच्या तारखेच्या आधी कार्ड रद्द करण्यासाठी बँकेकडे परत केले जात नाही.

वजावटीच्या सर्वसामान्य अधिकार किंवा कायद्याद्वारे किंवा इतर कोणत्याही कराराच्या अंतर्गत प्रदान केलेल्या इतर अधिकाराच्या व्यतिरिक्त, बँक, कोणतीही सूचना न देता, फॉरेक्स कार्डातील शिल्लक इतर कोणत्याही खात्यामध्ये एकत्रित किंवा विलीन करू शकते जे कार्डधारकाने बँकेकडे आणि/किंवा तिच्या समूह कंपन्यांकडे ठेवलेले आहेत, आणि कार्डधारकाच्या फॉरेक्स कार्डाच्या अंतर्गत बँकेच्या प्रति त्याच्या/तिच्या दायित्वांच्या पूर्ततेसाठी अशा इतर खात्यात (खात्यांमध्ये) जमा रक्कम वजा किंवा स्थानांतरित करू शकते. कार्डासाठी केलेल्या अर्जामध्ये नमूद पत्रव्यवहाराच्या कार्डधारकाच्या पत्त्यामध्ये काही बदल झाल्यास त्याने/तिने त्याविषयी बँकेला ताबडतोब कळवले पाहिजे. पत्रव्यवहाराचा बरोबर पत्ता बँकेला कळवलेला आहे याची खात्री करण्याची जबाबदारी पूर्णपणे कार्डधारकाची असेल आणि चुकीच्या पत्त्यामुळे कार्डधारकाला होणाऱ्या कोणत्याही नुकसानी किंवा दायित्वाच्या प्रकरणी बँक सर्व दायित्वे नाकारते.

कार्डधारक अशा सर्व अटी आणि नियमांचे पालन करण्यासाठी सहमत आहे जे बँक किंवा तिच्या संलग्न कंपनी वेळोवेळी कार्डधारकाने लाभ घेतलेल्या सुविधा/सेवांसाठी निर्धारित करू शकतात आणि याद्वारे सहमत आहे आणि पुष्टि करतो कि इंटरनेट, वर्ल्ड वाइड वेब, इलेक्ट्रॉनिक डेटा इंचरचेंज, कॉल सेंटर्स, टेलीसर्विस ऑपरेशन्स (मग ते वॉईस, व्हिडीयो, डेटा किंवा या सर्वांचे एकत्रित असेल) किंवा इलेक्ट्रॉनिक, संगणक, ऑटोमेटेड मशिन्स नेटवर्कच्या माध्यमाद्वारे किंवा दूरसंचाराच्या इतर साधनांच्या माध्यमातून सुदूर व्यवहार करण्यासाठी

सुविधांच्या द्वारे किंवा माध्यमातून केलेले असे सर्व व्यवहार, जे बँक किंवा तिच्या संलग्न कंपन्यांच्या द्वारे स्थापित केलेले आहेत, त्यांच्याद्वारे देऊ केलेल्या अशा सुविधा/सेवांसाठी आणि त्यांच्या संदर्भात, कायदेशीररित्या बंधनकारक आणि वैध्य व्यवहार प्रस्थापित करतील जेव्हा ते बँक किंवा तिच्या संलग्न कंपन्यांद्वारे अशा सुविधा/सेवांसाठी निर्धारित केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करतील, जे वेळोवेळी निर्धारित केले जाऊ शकतात.

या अटी आणि नियमांमध्ये बदल

बँक कोणत्याही वेळी या अटी आणि नियमांमध्ये, फॉरेक्स कार्डावर दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि लाभांमध्ये, कोणत्याही मर्यादेशिवाय, बदल करण्याचा अधिकार राखून ठेवते जे विद्यमान शिल्लक, शुल्क किंवा दर आणि गणनेच्या पद्धतींना प्रभावित करतात.